प्रत्यक्ष कर महसुलात १३ टक्के वाढ

नवी दिल्ली: सरकारचे निव्वळ कर संकलन चालू आर्थिक वर्षात १७ सप्टेंबरपर्यंत १२.१२ लाख कोटी रुपयांवर पोहोचले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात १३ टक्के वाढ नोंदविण्यात आली असून, कंपन्यांकडून आगाऊ कर भरण्याचे प्रमाण वाढल्याने एकूण महसूल वाढल्याचे केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने शुक्रवारी जाहीर केलेल्या आकडेवारीने स्पष्ट केले. सप्टेंबरपर्यंत आगाऊ कर भरण्यात १६.१८ टक्के वाढ होऊन तो ५.२२ लाख कोटी रुपये झाला आहे. त्यात कंपन्यांचा अग्रिम करभरणा १८ टक्के वाढून ४.१६ लाख कोटी झाला आहे.

रोखीचे व्यवहार वाढण्याची भीती निराधार

रिझर्व्ह बँक डेप्युटी गव्हर्नर मुर्मू यांचे प्रतिपादन

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: यूपीआय व्यवहारांवर प्रक्रिया शुल्क अर्थात 'एमडीआर' लागू केल्यामुळे रोखीच्या व्यवहारात अचानक वाढ होईल, ही भीती निराधार आहे, असे रिझर्व्ह बँकेचे डेप्युटी गव्हर्नर शिरीष चंद्र मुर्मू यांनी शुक्रवारी प्रतिपादन केले. ही भीती अनाठायी असल्याचे त्यांनी नमूद केले.येत्या १५ ऑक्टोबरपासून २,००० रुपयांपेक्षा अधिक रकमेच्या व्यक्ती ते व्यापारी यूपीआय व्यवहारांवर शुल्क ग्राहकांकडून नव्हे, तर व्यापाऱ्यांना अदा करावे लागेल आणि ज्याची कमाल मर्यादा ३०० रुपये मर्यादित असेल. दोन व्यक्तींमधील व्यवहार तसेच दैनंदिन व्यवहारांमधील बहुतांश व्यापारी व्यवहार पूर्णपणे विनाशुल्क राहतील. तरी यातून रोखीचे व्यवहार वाढतील असे सूचित केले जात आहे. यावर बोलताना मुर्मू वित्तीय बाजार परिषदेत म्हणाले, 'हे खरे ठरेल असे वाटत नाही. ही केवळ एक भीती आहे.'

ते पुढे म्हणाले, 'एमडीआर शुल्क हे यूपीआय व्यवहारांसाठी येणारा खर्च कसा वसूल केला जावा यात झालेला एक मोठा बदल आहे. रोख व्यवहार वाढतील असा काही जणांचा दावा जसा आहे, त्याप्रमाणे याचा प्रत्यक्ष व्यवहारांवर कोणताही परिणाम होणार

नाही, असे मलाही वाटते.'

डिजिटल व्यवहार आणि चलनांचा प्रसार होत असताना, दुसरीकडे चलनात असलेली रोख रक्कम, विशेषत: नोटांवर कसा परिणाम होत आहे, याचे आपण परीक्षण करत असल्याचे मूर्मू यांनी सांगितले. डिजिटल व्यवहारांत वाढ झाल्यानंतर चलनातील रोख रक्कम साहजिकच कमी व्हायला हवी. मात्र ही अपेक्षा आकडेवारीतून खरी ठरलेली नाही, हे

विरोधाभास बेगडी

वाढते डिजिटल व्यवहार आणि दुसरीकडे चलनातील रोख रक्कम देखील वाढत आहे, यांमधील कथित विरोधाभासावर बोलताना मुर्मू म्हणाले की, यात कोणताही विरोधाभास नाही. कारण रोख रक्कम ही व्यवहाराचे साधन आणि संपत्ती साठवण्याचे माध्यम, अशा दोन्ही भूमिका बजावते. सध्या उभा केला जाणारा विरोधाभास प्रत्यक्षात माध्यमांनी आणि विश्लेषकांनी काढलेला निष्कर्ष आहे.

मान्य करत त्यांचे याचे कारणही स्पष्ट केले. या दोन्ही गोष्टी एकाच वेळी समांतरपणे घडत आहेत आणि हे विरोधाभासी नसल्याचे ते म्हणाले.

टाटा सन्सबाबत रिझर्व्ह बँकेच्या निर्णयाचे शापूरजी पालनजी समूहाकडून स्वागत

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: टाटा समूहाची नियंत्रक कंपनी असलेल्या टाटा सन्सच्या सूचिबद्धतेचा मार्ग रिझर्व्ह बँकेच्या निर्णयामुळे मोकळा झाला असून, त्याला पाठिंबा दर्शविणारी भूमिका या दीडशेहून अधिक वर्षे जुन्या उद्योग समूहात मोठी मालकी राखणाऱ्या शापूरजी पालनजी समूहाने शुक्रवारी जारी केलेल्या निवेदनांतून व्यक्त केली. नियमांनुसार समभाग सूचिबद्ध करण्याचे निर्देश दिल्याबद्दल रिझर्व्ह बँक आणि सरकारचे त्यात आभारही मानण्यात आले आहेत.

मिस्त्री म्हणाले की, टाटा सन्स हा देशातील महत्वाची उद्योग संस्था आहे. ती सूचिबद्ध झाल्यास पारदर्शकता वाढण्यासोबत तिचे सामाजिक दायित्वही वाढेल. सूचिबद्धता हे केवळ वित्तीय अथवा नियामक पाऊल नसून, ती सामाजिक आणि नैतिक जबाबदारी आहे. टाटा न्यासांच्या धर्मादाय भूमिकांचे संरक्षण करून प्रशासन आणखी भक्कम करण्याची ही संधी आहे.

या माध्यमातून टाटा न्यासांकडून चालवल्या जाणाऱ्या समाजकारणाला अधिक विस्तार साधता येईल, असा विश्वास मिस्त्री यांनी व्यक्त केला. तसेच, एसपी समूह आणि टाटा समूहातील शतकानुशतकांचे जुने संबंध अधिक दृढ करून भविष्यात देशाच्या हितासाठी एकत्र काम करण्याची तयारी त्यांनी दर्शवली आहे.

शापूरजी पालनजी (एसपी) समूह टाटा सन्समधील १८.४ टक्के हिस्सेदारीसह दुसऱ्या क्रमांकाचा मोठा भागधारक आहे. एसपी समूहाचे प्रमुख शापूर मिस्त्री यांनी एक सविस्तर निवेदन जारी करून, टाटा सन्सच्या सूचिबद्धतेबाबत रिझर्व्ह बँकेच्या निर्णयाची स्वागताची जाहीर केलेली भूमिका ही टाटा न्यासांकडून त्यासंबंधाने असलेल्या विरोधाच्या पार्श्वभूमीवर महत्त्वपूर्ण ठरली आहे.

पंतप्रधान मोदींच्या धोरणांची मुक्तकंठाने स्तुती

शापूर मिस्त्री यांनी निवेदनात, देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने आणि विशेषत: पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संस्थांना बळकट करण्यासाठी घेतलेली भूमिका अत्यंत गौरवास्पद असल्याचे नमूद केले आहे. ते म्हणाले, 'नीती आयोगाची स्थापना, पारदर्शक व उत्तरदायी कारभारावर दिलेला भर आणि रिझर्व्ह बँकेच्या स्वायत्ततेबद्दल सरकारने दाखवलेला आदर, हे एका सशक्त भारताची पायाभरणी मजबूत करणाऱ्या संस्थात्मक बांधणीचे उत्तम उदाहरण आहे.' कायदेशीर चौकटीत राहून संस्थांचे अधिकार संपन्न करणे हे खऱ्या राजनैतिक मुत्सद्देगिरीचे लक्षण असल्याचे सांगत त्यांनी मोदींच्या दूरदृष्टीचा गौरव केला आहे. टाटा सन्सला रिझर्व्ह बँक आणि सरकारने दिलेल्या निर्देशांबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले आहे. या संपूर्ण प्रक्रियेत पारदर्शकता राखताना, आकारमानाला न जुमानता प्रत्येक संस्थेला एकाच नियमाच्या चौकटीत ठेवण्याची शिस्त दाखवली गेल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

'सेन्सेक्स'ची नरमाई, 'निफ्टी' सलग तिसऱ्या सत्रात तेजीत!

मुंबई: खनिज तेल दरात झालेली घसरण, मात्र आयटी आणि टाटा समूहाच्या समभागांतील कमजोरी यामुळे शुक्रवारी भांडवल बाजार संमिश्र स्वरूपात बंद झाले. सत्राच्या समाप्तीला झालेल्या नफावसुलीमुळे सेन्सेक्स नाममात्र १९.६३ अंशांनी घसरून ७४,२९४.९६ वर बंद झाला. दिवसाच्या सत्रात तो ४१३.८५ अंशांनी वाढून ७४,७२८.४४ च्या उच्चांकापर्यंत पोहोचला होता. दुसरीकडे, निफ्टी निर्देशांक ७५.८० अंशांनी वाढून २३,३४६.४० पातळीवर बंद झाला. सलग तिसऱ्या सत्रात निफ्टीने तेजी राखली असून, सलग दुसऱ्या सत्रात त्याचे सेन्सेक्सच्या तुलनेत पारडे जड राहिले.

YES BANK येस बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय: येस बँक हाऊस, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवे, सांताक्रूझ (पू.), मुंबई- ४०००५५.
शाखा कार्यालय: १९वा मजला, सी विंग, एम्पायर टॉवर, रीलायबल टेक पार्क, क्लाऊड सीटी कॅम्पस, प्लॉट क्र. ३१, ठाणे-बेलापूर रोड, ऐरोली, नवी मुंबई- ४००७०८

सर्फेसी अधिनियमातील अनु. १३(२) अंतर्गत सूचना प्रकाशन

याद्वारे सूचित करण्यात येते की खाली नमूद कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाणकारांनी बँकेकडून घेतलेल्या कर्ज सुविधांच्या मुद्दल व व्याजाच्या परतफेडीमध्ये कसूर केलेली असून त्यांचे खाते अनुत्पादक मत्ता (एनपीए) म्हणून वर्ग करण्यात आले आहे. सिक्युरीटायझेशन अॅण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल अॅसेट्स अॅण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट अॅक्ट, २००२ (सर्फेसी अधिनियम) मधील अनुच्छेद १३(२) अंतर्गत सूचना पाठवून त्यांना सदर मागणी सूचनेत नमूद रकमेची परतफेड करण्याचे आवाहन करण्यात आले. वरील संदर्भात, याद्वारे पुन्हा एकदा खाली नमूद कर्जदार/ सह-कर्जदार/ जामीनदार/ गहाणकारांना या जाहीर सूचनेच्या माध्यमाने आवाहन करण्यात येते की त्यांनी खाली नमूद थकबाकी रकमेसह त्यावरील पुढील व्याजाचा ही सूचना प्रकाशित होण्याच्या ६० दिवसांच्या आत भरणा करावा, असे न केल्यास ६० दिवसांनंतर सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद १३ मधील उप-विभाग (४) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत पुढील पावले उचलली जातील.

मागणी सूचना/ कर्जदार/ तारण मालमत्तेचे तपशील

अ. क्र.	कर्ज खाते क्र.	कर्जदार, सह-कर्जदार, गहाणकार व जामीनदाराचे नाव	तारण मालमत्तेचे वर्णन (१३(२) सूचनेनुसार संपूर्ण पत्ता)	१३(२) सूचनेनुसार दावा केलेली एकूण रक्कम	अनु. १३(२) सूचना दिनांक एनपीए दिनांक
१	HLN00210 1507469	**श्री. संतोष भास्कर ठाकरे** (कर्जदार आणि गहाणकार) **श्रीमती अश्विनी संतोष ठाकरे** (सह-कर्जदार आणि गहाणकार)	निवासी सदनिका क्र. ४०२, चौथा मजला, क्षेत्रफळ सुमारे ६०.५४ चौ.मी. चटई क्षेत्रफळ यासह लगतची बाल्कनी क्षेत्रफळ सुमारे ११.२५ चौ.मी. चटई क्षेत्रफळ म्हणजे एकूण ७१.७९ चौ.मी. चटई क्षेत्रफळ, "समर्थ प्लाझा" या इमारतीत, जमीन प्लॉट क्र. ८९ वर बांधलेली, सर्व्हे क्र. ९०१/८९, मौजे नाशिक शहर, ता. आणि जिल्हा नाशिक, **मालक** श्री. संतोष भास्कर ठाकरे आणि श्रीमती अश्विनी संतोष ठाकरे	**Rs. 34,41,756.64/-**	**08.09.2026 31.08.2026**

याशिवाय, आपले लक्ष सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद १३(८) कडे वेधण्यात येते ज्यायोगे विक्री किंवा हस्तांतरणाच्या दिनांकाआधी कधीही आम्हाला घेणे असलेल्या थकबाकी रकमेसह सर्व खर्च, अधिभार व शुल्कांचा भरणा केल्यास, आमच्याकडून अनामत मत्तेची विक्री किंवा हस्तांतरण केले जाणार नाही, किंवा अनामत मत्तेची विक्री किंवा हस्तांतरण करण्यासाठी कोणतीही पावले उचलली जाणार नाहीत.

दिनांक: १९.०९.२०२६
स्थान: नाशिक

स्वा/-, प्राधिकृत अधिकारी
येस बँक लिमिटेड

kotak® कोटक महिंद्रा बँक लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : २७ बीकेसी, सी-२७, जी-ब्लॉक, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू.), मुंबई, महाराष्ट्र-४०००५१
शाखा कार्यालय : कोटक इन्फिनिटी, पाचवा मजला, झोन IV, बिल्डिंग क्र. २१, इन्फिनिटी आयटी पार्क, वेस्टर्न एक्स्प्रेस हायवेजवळ, जनरल ए. के. वैद्य मार्ग, मालाड (पूर्व), मुंबई-४०००९७.
कॉर्पोरेट ओळख क्रमांक : L65110MH1985PLC038137, **www.kotak.com**

स्थावर मालमत्तेची ई-लिलाव-सह-विक्री सूचना

सुरक्षा हितसंबंध अंमलबजावणी अधिनियम, २००२सह सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२च्या नियम ६(२), ८(६) आणि ९(१)च्या परंतुकासह वाचून वित्तीय मालमत्तेचे सिक्युरिटायजेशन आणि पुनर्रचनाअंतर्गत जंगम आणि स्थावर मालमत्तेच्या विक्रीसाठी ई-लिलाव विक्री सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेला आणि विशेषत: खाली नमूद केलेल्या कर्जदार, जामीनदार आणि/किंवा गहाणदार यांना सूचना देण्यात येत आहे की, **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड** ('सुरक्षित धनको') यांच्याकडे गहाण/ प्रभारित असलेली खाली वर्णन केलेली स्थावर मालमत्ता, जिचा ताबा सुरक्षित धनकोच्या अधिकृत अधिकाऱ्याने खाली नमूद केलेल्या संबंधित तारखांना घेतला आहे, ती मालमत्ता, खाली नमूद केलेल्या कर्जदार, जामीनदार आणि/ किंवा गहाणदार यांच्याकडून, सुरक्षित धनको असलेल्या कोटक महिंद्रा बँक लिमिटेडला देय असलेल्या संबंधित रकमेच्या वसुलीसाठी, तसेच रक्कम अदा होईपर्यंत चक्रवाढ व्याजाच्या आधारावर करारानुसार दराने पुढील व्याज आणि इतर शुल्क वसूल करण्यासाठी, **दिनांक १५.१०.२०२६ रोजी 'जेथे जशी आहे तशी', 'जे आहे ते', 'तेथे जे काही आहे ते' आणि 'दावा न करण्याचा आधार' या तत्त्वांवर ई-लिलावाद्वारे** विकली जाईल.

कर्जदार, जामीनदार व गहाणकाराचे नाव	थकीत रकमेसह १३(२) नोटीसचा तपशील	थकबाकी	गहाण ठेवलेल्या मालमत्तेचा ताबा मिळण्याची तारीख
१. मे. अंबा ॲग्रो इंडस्ट्रीज (कर्जदार व गहाण ठेवणारे) (त्यांचे अधिकृत भागीदार ए. श्री. राजेश मुंदडा आणि बी. गगन मालपाणी यांच्यामार्फत प्रतिनिधित्व) २. श्री राजेश रमेश मुंदडा (सह-कर्जदार) ३. श्री गगन हरिप्रसाद मालपाणी (सह-कर्जदार) ४. श्री गंगाबिशन मदनगोपाल भुतडा (सह-कर्जदार) ५. श्री मुकेश दलचंद अग्रवाल (सह-कर्जदार)	२३.०४.२०२४ २३.०४.२०२४ रोजीनुसार रु. ४,१६,६०,९५३.३७	दिनांक ०१.०९.२०२६ रोजीनुसार रु. ५,९३,५२,१७३.९२	२८.०१.२०२५

लिलावासाठी ठेवलेल्या स्थावर मालमत्तेचा तपशील/ वर्णन, राखीव किंमत, बयाणा रक्कम आणि लिलावाचे वेळापत्रक खाली नमूद केले आहे :

गहाण ठेवणाऱ्या(ऱ्यां)ची नावे	**मे. अंबा ॲग्रो इंडस्ट्रीज (लॉट I व II)**
ई-लिलावासाठी ठेवलेल्या स्थावर मालमत्तांचा तपशील	**लॉट १: गहाण:** लातूर येथे स्थित हरंगुल (बु.) मधील प्लॉट क्रमांक बी-१२३ आणि प्लॉट क्रमांक बी-१२३/१, एमआयडीसीच्या मालकीची, मुकेश (दलचंद अग्रवाल यांचा मुलगा), राजेश (रमेश मुंदडा यांचा मुलगा), गगन (हरिप्रसाद मालपाणी यांचा मुलगा) आणि गंगाबिशन (मदनगोपाल भुतडा यांचा मुलगा), भागीदार अंबा ॲग्रो इंडस्ट्रीज यांच्या भाडेपट्ट्यावरील संपूर्ण जमीन. अंबा ॲग्रो इंडस्ट्रीज, हरंगुल (बु.) अतिरिक्त एमआयडीसी, लातूर येथे स्थित असून, तिचे एकूण क्षेत्रफळ ८४९४ चौ. मीटर आणि बांधकाम क्षेत्रफळ ४३१९.८३ चौ. मीटर आहे. तिच्या सीमा खालीलप्रमाणे आहेत: **पूर्व:** एमआयडीसी मोकळी जागा क्र. २२, **पश्चिम:** भूखंड क्र. बी-१२४ आणि बी-१२५, **दक्षिण:** एमआयडीसी रस्ता (३० मीटर रुंद), **उत्तर:** एमआयडीसी मोकळी जागा क्र. २२. त्यावरील सर्व विद्यमान इमारती आणि संरचना, तसेच संबंधित गहाणखतांच्या तारखेपासून किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी त्यावर उभारल्या/ बांधल्या जाणाऱ्या इमारती आणि संरचना, त्यामधील सर्व जोडण्या, आणि जमिनीला जोडलेले किंवा जमिनीला जोडलेल्या कोणत्याही वस्तूला कायमस्वरूपी घट्ट बसवलेले, वर्तमान आणि भविष्यातील सर्व स्थिर वस्तू, फर्निचर आणि संयंत्र व यंत्रसामग्री यांसह. **तारण : प्लांट आणि मशिनरी :** सॉर्टिंग मशीन नांता ३०००G सीसीडी कॅमेरा सॉर्टर मॉडेल NANTA3128 G-चायना मेड, वेल्डिंग ट्रान्सफॉर्मर, हॉपर्स २×२.४×१, हॉपर्स २,३×२,३×१, हॉपर्स १×१×१, हॉपर्स ३×३×१, एलिव्हेटर्स- ७ मीटर उंची (८'×८'), इलेक्ट्रॉनिक वजन मशीन, ट्रॉली मॅन्युअल, सॉर्टेक्स जुन्या प्रकारचा, जिन्यासह एलिव्हेटर्सची रचना (६ मीटर उंची × ४.५ मीटर रुंदी), जिना (उताराची लांबी ५×०.६ रुंदी), इलेक्ट्रिक पॅनल बोर्ड, ए/सी रिसीव्हर टँक, सॉर्टेक्स मशीन, मॉटर ०.५एचपी, एलिव्हेटर्स- १० मीटर उंची, इत्यादी. **लॉट II: तारण: प्लांट आणि मशिनरी:** सॉर्टिंग मशीन नांता ३०००G सीसीडी कॅमेरा सॉर्टर मॉडेल NANTA3128 G-चीन मेड, वेल्डिंग ट्रान्सफॉर्मर, हॉपर्स २×२,४×१, हॉपर्स २,३×२,३×१, हॉपर्स १×१×१, हॉपर्स ३×३×१, एलिव्हेटर्स ७ मीटर उंची (८'×८'), इलेक्ट्रॉनिक वजन मशीन, ट्रॉली मॅन्युअल, सॉर्टेक्स जुन्या प्रकारचा, जिन्यासह एलिव्हेटर्सची रचना (६ मीटर उंची × ४.५ मीटर रुंदी), जिना (उताराची लांबी ५×०.६ रुंदी), इलेक्ट्रिक पॅनल बोर्ड, ए/सी रिसीव्हर टँक, सॉर्टेक्स मशीन, मॉटर ०.५एचपी, एलिव्हेटर्स-१० मीटर उंची, इत्यादी.
ऑनलाइन बोली सादर करण्याची अंतिम तारीख	**लॉट I व लॉट II : १४.१०.२०२६ रोजी दुपारी ०४.०० वाजेपर्यंत.**
ई-लिलावाची तारीख आणि वेळ	**लॉट I व लॉट II : १५.१०.२०२६ रोजी दुपारी १२.०० ते १.०० च्या दरम्यान.**
राखीव किंमत (रु.)	**लॉट I : रु. ५,००,००,०००.००/- (फक्त पाच कोटी रुपये)** **लॉट II : रु. ९९,००,०००.०० (फक्त नव्याण्णव लाख रुपये)**
बयाणा रक्कम (ईएमडी) (रु.)	**लॉट I : रु. ५०,००,०००.००/- (फक्त पन्नास लाख रुपये)** **लॉट II : रु. ९,९०,०००.०० (फक्त नऊ लाख नव्वद हजार रुपये)**

मी, सही करणारा, माझ्या पूर्ण विवेकबुद्धीनुसार आणि संभाव्य खरेदीदारांच्या विनंतीनुसार, माझ्या अधिकृत प्रतिनिधी/एजंटमार्फत दिनांक ०१.१०.२०२६ रोजी दुपारी १२.०० ते ०२.०० या वेळेत सदर मालमत्तेच्या पाहणीची व्यवस्था करू शकेन.

महत्त्वाच्या अटी व शर्ती :

१) ई-लिलाव केवळ **https://www.bankeauctions.com/** या संकेतस्थळाद्वारे 'ऑनलाइन इलेक्ट्रॉनिक बोली' पद्धतीने **१५.१०.२०२६ रोजी दुपारी १२.०० ते दुपारी ०१.००** या वेळेत आयोजित केला जाईल, ज्यामध्ये प्रत्येकी ५ मिनिटांच्या अमर्याद मुदतवाढीसह बोली लावता येईल. २) ई-लिलावाविषयी अधिक माहितीसाठी, इच्छुक बोलीदार मे. सी१ इंडिया प्रा. लि. यांच्याशी श्री. धरणी कृष्णा यांच्यामार्फत संपर्क साधू शकतात - मोबाईल +९१-९९४८१८२२२२; ईमेल आयडी- andhra@c1india.com. ३) इच्छुक बोलीदार लिलावाचा तपशील आणि विक्रीच्या अटी व शर्तींसाठी बँकेच्या अधिकृत संकेतस्थळाला - **https://www.kotak.com/en/bank-auctions.html** ला भेट देऊ शकतात. ४) लिलाव विक्रीच्या सविस्तर अटी व शर्तींसाठी, बोली लावणाऱ्यांना **https://www.bankeauctions.com/** या पोर्टलला भेट देण्याचा सल्ला दिला जातो आणि सदर अटी व शर्ती बोली प्रक्रियेत सहभागी होणाऱ्या बोली लावणाऱ्यांवर बंधनकारक असतील. ५) इच्छुक बोली लावणाऱ्यांनी बोली आणि इतर कागदपत्रे अपलोड करण्यापूर्वी **https://www.bankeauctions.com/** या पोर्टलवरून लॉगीन आयडी आणि पासवर्ड तयार करावा, अशी विनंती आहे. ६) बोली अर्ज विहित नमुन्यात भरून, बोली लावणाऱ्यांच्या केवायसी कागदपत्रांसह, **१४.१०.२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत** https://www.bankeauctions.com/ या पोर्टलवर केवळ ऑनलाइन सादर/अपलोड करायचा आहे आणि निविदाकारांच्या रितसर भरलेल्या आणि स्वाक्षरी केलेल्या निविदा दस्तऐवजांच्या आणि केवायसीच्या स्कॅन केलेल्या प्रती pradeep.vishwakarma4@kotak.com आणि/किंवा dushyantsinh.zala@kotak.com आणि/किंवा mayur.pagare@kotak.com या पत्त्यांवर मेलद्वारे पाठवाव्यात. निविदाकाराने ईमेलचा विषय 'मे. अंबा ॲग्रो इंडस्ट्रीज यांच्या प्रकरणातील मालमत्ता खरेदीसाठी' असा लिहावा. ७) जर अधिकृत अधिकारी लॉट I आणि लॉट II या दोन्हींसाठी निविदा स्वीकारत असतील, तर कृपया नोंद घ्यावी की, लॉट I साठी प्राप्त झालेल्या निविदेला प्राधान्य दिले जाईल. ८) इच्छुक निविदाकार लॉगीन आयडी आणि पासवर्ड तयार करण्यासाठी आणि ऑनलाइन निविदा प्रक्रियेसाठी इत्यादी ऑनलाइन प्रशिक्षण, मे. सी१ इंडिया प्रा. लि. यांच्याकडून वर नमूद केलेल्या संपर्क क्रमांकांवर घेऊ शकतात. ९) बयाणा रक्कम (ईएमडी) आरटीजीएस/ एनईएफटी/ फंड ट्रान्सफरद्वारे खाते नाव - कोटक महिंद्रा बँक लिमिटेड, खाते क्रमांक ०६४१०१२५२७२००१, कोटक महिंद्रा बँक लि., नरिमन पॉइंट शाखा, मुंबई, आयएफएससी कोड: KKBK0000958, या खात्यात दिनांक **१४.१०.२०२६ रोजी सायंकाळी ०४.०० वाजेपर्यंत** जमा करावी. आरटीजीएस/एनईएफटी/फंड ट्रान्सफर केवळ इच्छुक निविदाकाराच्या खात्यातूनच केले जाईल. कोणत्याही तांत्रिक बिघाडामुळे विहित वेळेत ईएमडी जमा करण्यास आणि/किंवा बोली दस्तऐवज सादर करण्यास विलंब झाल्यास, बोली सहभाग आणि आपापसातील बोली प्रक्रिया जास्तीत जास्त करण्यासाठी, प्राधिकृत अधिकारी, त्यांच्या पूर्ण विवेकानुसार आणि समाधान झाल्यावर, कोणत्याही व्यक्तीला कोणतीही माहिती न देता निर्धारित कटऑफ वेळेनंतर प्राप्त झालेली बोली स्वीकारू शकतात. ईएमडी रक्कम जमा न करता सादर केलेली कोणतीही बोली आपोआप नाकारली जाईल. प्रस्तावित बोलीदाराने जमा केलेल्या ईएमडीवर कोणतेही व्याज मिळणार नाही. १०) सादर करावयाची बोली किंमत राखीव किमतीच्या समान आणि/किंवा त्याहून अधिक असेल आणि बोली प्रक्रियेदरम्यान, ज्या बोलीदारांनी बोली सादर केली आहे, ते त्यांच्या पुढील बोलींमध्ये रुपये १,००,०००.०० (फक्त एक लाख रुपये) च्या पटीत सुधारणा करतील. ११) ई-लिलाव प्रक्रियेच्या अंतिम वेळेच्या शेवटच्या ५ मिनिटांत कोणतीही बोली लावल्यास, अंतिम वेळ आपोआप आणि त्वरित आणखी ५ मिनिटांनी वाढवली जाईल. १२) यशस्वी बोलीदाराला सर्वोच्च बोलीच्या २५% रक्कम ई-लिलाव विक्री प्रक्रिया बंद झाल्यावर लगेच किंवा ई-लिलावाच्या दिवशी कार्यालयीन वेळ बंद असल्यास, पुढील कामकाजाच्या दिवशी, वर नमूद केलेल्या पद्धतीने रक्कम (आधीच भरलेल्या ईएमडीसह) जमा करावी लागेल. सर्वोच्च बोली रकमेच्या उर्वरित ७५% रक्कम, यशस्वी बोली लावणाऱ्याला विक्रीची स्वीकृती/ पुष्टी कळवल्याच्या तारखेपासून १५ दिवसांच्या आत किंवा अधिकृत अधिकाऱ्याच्या पूर्ण विवेकानुसार ठरवलेल्या वाढीव कालावधीत आणि सरफेसी कायदा, २००२ व सुरक्षा हितसंबंध नियम, २००२च्या तरतुदींनुसार जमा करावी लागेल. १३) जोपर्यंत सर्वोच्च बोली लावणाऱ्याच्या नावे विक्री प्रमाणपत्र जारी होत नाही, तोपर्यंत मालमत्तेवर त्याचा कोणताही हक्क आणि मालकी असणार नाही, संपूर्ण लिलाव किंमत आणि इतर आनुषंगिक खर्चाची वसुली, विक्री ई-लिलावाच्या अटी व शर्तींच्या अधीन असेल आणि पुष्टीकरणाच्या सुरक्षित धनकोच्या अधीन असेल. १४) जर यशस्वी बोलीदार संपूर्ण बोली/ लिलावाची रक्कम जमा करण्यास अयशस्वी ठरला, तर यशस्वी बोलीदाराने आधीच जमा केलेली रक्कम जप्त केली जाईल आणि चूक करणाऱ्या बोलीदाराचा मालमत्तेवर किंवा जमा केलेल्या रकमेवर कोणताही हक्क राहणार नाही. प्राधिकृत अधिकारी लिलावाच्या मालमत्तेच्या/मालमत्तेच्या संदर्भात, सरफेसी कायदा, २००२ आणि सुरक्षा हितसंबंध नियम, २००२च्या तरतुदींनुसार त्याला उपलब्ध असलेले एक किंवा अधिक हक्क वापरण्यास स्वतंत्र असेल. १५) वर नमूद केलेल्या विहित कालावधीत संपूर्ण विक्री मूल्य प्राप्त झाल्यावर, प्राधिकृत अधिकारी विक्री प्रमाणपत्र जारी करेल, त्यानंतर विक्री पूर्ण होईल आणि कोटक महिंद्रा बँक लिमिटेड कोणताही दावा स्वीकारणार नाही. १६) विक्री प्रमाणपत्रात त्याच नावाने जारी केले जाईल, ज्या नावाने बोली सादर केली आहे. बोलीमध्ये नमूद केलेल्या व्यक्तीव्यतिरिक्त इतर कोणत्याही व्यक्तीच्या नावांचा विक्री प्रमाणपत्रात समावेश/ बदल करण्याची कोणतीही विनंती स्वीकारली जाणार नाही. १७) अयशस्वी बोली लावणाऱ्यांना अनामत रक्कम (ईएमडी) कोटक महिंद्रा बँक लि.द्वारे त्यांच्या खात्यात आरटीजीएस/एनईएफटी/निधी हस्तांतरणाद्वारे, १० (दहा) कामकाजाच्या दिवसांच्या आत आणि कोणत्याही व्याजाशिवाय परत केली जाईल. १८) अधिकृत अधिकाऱ्याला कोणतेही कारण न देता बोली स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा किंवा अधिसूचित ई-लिलाव विक्री पुढे ढकलण्याचा/रद्द करण्याचा पूर्ण अधिकार आहे. बोली सादर केल्यानंतर ई-लिलाव विक्री पुढे ढकलल्यास/ रद्द केल्यास, बोली लावणाऱ्यांनी जमा केलेली अनामत रक्कम (ईएमडी) व्याजाशिवाय परत केली जाईल आणि बोली नाकारल्यास, अधिकृत अधिकारी कोणत्याही बोली लावणाऱ्याशी किंवा इतर पक्षांशी खासगी करारद्वारे मालमत्तेच्या विक्रीसाठी वाटाघाटी करू शकतात. १९) बोलींच्या अभावामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे ई-लिलाव विक्री अयशस्वी झाल्यास, अधिकृत अधिकारी प्रस्तावित खरेदीदाराशी किंवा मालमत्ता खरेदी करण्याची ऑफर देणाऱ्या इतर कोणत्याही पक्षाशी, संपूर्ण मालमत्तेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या विक्रीसाठी खासगी करार करू शकतात. २०) आयोजित केलेल्या ई-लिलाव विक्रीमध्ये एखाद्या बोलीदाराला यशस्वी बोलीदार म्हणून घोषित केले गेल्यास आणि त्यानंतर, विक्री प्रमाणपत्र जारी होईपर्यंत आणि ताबा देईपर्यंत कोणत्याही टप्प्यावर, कोणत्याही न्यायालय/न्यायाधिकरणाद्वारे लिलावाच्या कार्यवाहीला स्थगिती दिल्यास, ज्यामध्ये बँकेला पुढील कार्यवाही करण्यापासून रोखण्याचा समावेश आहे परंतु तेवढ्यापुरतेच मर्यादित नाही, तर त्या बोलीदाराला त्याने/तिने जमा केलेल्या ईएमडी/रकमेच्या परतावाचा किंवा मालमत्तेच्या विक्रीसाठी जमा केलेल्या रकमेवरील कोणत्याही व्याजाचा दावा करण्याचा कोणताही अधिकार राहणार नाही. बँक आपल्या पूर्ण विवेकानुसार, जमा केलेली रक्कम कोणत्याही व्याजाशिवाय आणि/किंवा नुकसानीशिवाय आणि/किंवा दाव्यांशिवाय परत करेल आणि या संदर्भात कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार स्वीकारला जाणार नाही. २१) जर कोणत्याही बोलीदाराला लिलावातील एकापेक्षा जास्त मालमत्तांसाठी बोली लावायची असेल, तर बोलीदाराने वर नमूद केलेल्या प्रक्रियेचे पालन करून प्रत्येक मालमत्तेसाठी स्वतंत्र बोली सादर करावी लागेल (जर या ई-लिलावाला लागू असेल तर). २२) वरील अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या तारण मालमत्तेचा तपशील अधिकृत अधिकारी/तारण धनको यांच्या माहितीनुसार सर्वोत्तम प्रकारे नमूद करण्यात आला आहे, परंतु या घोषणेतील कोणत्याही त्रुटी, चुकीच्या विधानासाठी किंवा वगळण्यासाठी अधिकृत अधिकारी/तारण धनको जबाबदार राहणार नाहीत. २३) बँकेला हरण केलेल्या कोणतेही बोजे ज्ञात नाहीत. लिलाव झालेल्या मालमत्तेच्या संदर्भात सरकार किंवा इतर कोणाकडेही असलेल्या कोणत्याही शुल्क, धारणाधिकार, बोजा किंवा इतर कोणत्याही देय रकमांसाठी अधिकृत अधिकारी किंवा बँक जबाबदार राहणार नाहीत. इच्छुक बोलीदाराला सल्ला देण्यात येतो की, त्यांनी मालमत्तेवरील बोजांविषयी, ज्यात वैधानिक दायित्वे, मालमत्ता कराची थकबाकी, वीज देयके इ. यांचा समावेश आहे, स्वत:हून स्वतंत्र चौकशी करावी. २४) नोंदणी शुल्क, मुद्रांक शुल्क, कर इत्यादींसह सर्व वैधानिक देयके/ इतर देयके खरेदीदाराला भरावी लागतील. २५) या सूचनेअंतर्गत लिलाव-सह-विक्रीसाठी ठेवलेल्या मालमत्तेच्या संदर्भातील सर्व बाह्य खर्च म्हणजेच महानगरपालिका कर, देखभाल/ सोसायटी शुल्क, वीज आणि पाणी शुल्क आणि हस्तांतरण शुल्क/ फीसह